**<u>उर्वरित उलटतपास आरोपींचे वकील श्री. एन. जी. शहा यांचे मार्फत शपथेवर सुरू.</u>**

**११.** हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीमध्ये नमुद केल्याप्रमाणे घेतलेल्या कर्जावर मी व्याजापोटी रक्कम रूपये ५,००,०००/— देउन देखील आरोपींनी चक्रवाढ व्याजाने व्याज आकारून रक्कम रूपये १३,६५,०००/— ची मागणी माझ्याकडे केल्याबद्दल कोणताही लेखी पुरावा मी पोलीसांना दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१/०३/२०१६ रोजी आरोपींकडून रक्कम रूपये ४,५०,०००/— कर्ज घेतले होते याबाबतचा कागदोपवत्री पुरावा मी पोलीसांना दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०१/०३/२०१६ रोजीचा रक्कम रूपये ४,५०,०००/— घेतल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०१/०३/२०१६ रोजी व्याजाने रक्कम रूपये ४,५०,०००/— घेतल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १९/०७/२०१८ रोजीचा करारनामा वैशाली सोमनाथ सपकळ हिस मी अथवा माझ्या वडीलांनी करून दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १९/०७/२०१८ रोजीचा करारनामा विष्णु मारूती जाधव यांनी वैशाली सोमनाथ सपकळ हिस करून दिलेला आहे. साक्षीदार स्वतः सांगतो सोमनाथ सपकळ यांच्या सांगणेवरून सदर करारनामा वैशाली सपकळ हिस करून दिलेला आहे. दिनांक १९/०७/२०१८ रोजीचा करारनामा मी वाचून बघितला. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १९/०७/२०१८ रोजीच्या करारनाम्यामध्ये सदर करारनामा सोमनाथ सपकळ यांच्या सांगणेवरून वैशाली सपकळच्या नावे करून दिल्याचे नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १९/०७/२०१८ रोजीच्या करारनाम्यासोबत नमुद केलेला फ्लॅट हा माझ्या मालकीचा असून सदर फ्लॅट हा माझ्या मालकीचा असून वैशाली सपकळच्या नावे करून देण्याबददलचे लेखी अधिकारपत्र सदर करारनाम्यासोबत जोडलेले नाही. साक्षीदार स्वतः सांगतो सदर अधिकारपत्र माझ्याकडे आहे परंतु ते

करारनाम्यासोबत जोडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर अधिकारपत्र मी प्रस्तुत फिर्याद दाखल करतेवेळी पोलीसांना दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर अधिकारपत्र अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १९/०७/२०१८ रोजीच्या फ्लॅटच्या करारनाम्यावर माझी अथवा माझ्या वडीलांची मान्यता देणार म्हणून स्वाक्षरी नाही. हे म्हणणे खरे नाही की, विष्णु मारूती जाधव व वैशाली सोमनाथ सपकळ यांचेमध्ये दिनांक १९/०७/२०१८ रोजीचा करारनामा हा त्यांचा स्वतंत्र करारनामा असल्यामुळे सदर करारनाम्यामध्ये माझा अथवा माझ्या वडीलांच्या नावाचा कुठेही उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १९/०७/२०१८ रोजीचा करारनामा चक्रवाढ व्याजानुसार झालेल्या रक्कम रूपये १३,६५,०००/— या रकमेपोटी झाला आहे याबाबतचा वेगळा करारनामा दिनांक १९/०७/२०१८ रोजी अथवा तद्नंतर मी व आरोपी सोमनाथ सपकळ अथवा त्याची पत्नी वैशाली सपकळ यांचेमध्ये झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ४० वरील खरेदीपत्र सन २०१६ मध्ये झाले असून वर नमुद करारनामा सन २०१८ मध्ये झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वर नमुद करारनाम्यानंतर साधारणपणे ४ वर्षांनंतर प्रस्तुत फिर्याद दाखल केली आहे. साक्षीदार स्वत: सांगतो सन २०१८ मध्ये देखील मी नातेपुते पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ४० वरील खरेदीपत्र हे नातेपुते विभागामधील असल्यामुळे त्या ठिकाणच्या पोलीस ठाणेमध्ये मी तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, नातेपुते पोलीस ठाणे येथे मी दिलेली तक्रार ही दिवाणी स्वरूपाची बाब असल्याचे सांगून सदर तक्रारी अर्ज नातेपुते पोलीसांनी निकाली काढला. हे म्हणणे खरे आहे की, अर्ज निकाली करणेपूर्वी नातेपुते पोलीसांनी माझेकडे तक्रारीबाबत चौकशी केली तसेच निशाणी क्र. ४० वरील खरेदीपत्र देखील मागवून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत फिर्याद दाखल करतेवेळी मी नातेपुते पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारी अर्जाबाबत पोलीसांना सांगितले नव्हते. आता मला दिनांक २६/०१/२०२२

रोजीचा माझा फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २६/०१/२०२२ रोजीच्या वालचंदनगर पोलीस ठाणे येथे दिलेल्या माझ्या फिर्यादी जबाबामध्ये नातेपुते पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीबाबतचा मजकूर नमुद नाही. दिनांक २६/०१/२०२२ रोजीच्या फिर्यादी जबाबास **निशाणी क्र. ४१** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, नातेपुते पोलीस ठाणेने माझा तक्रारी अर्ज निकाली काढल्यानंतर वालचंदनगर पोलीस ठाणे येथे मी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, महाराष्ट्र सावकारी अधिनियमाअंतर्गत फिर्यादीमध्ये नमुद केलेले व्यवहार सावकारीचे असल्याबाबत सहाय्यक सहकार निबंधक, इंदापूर व माळशिरस तसेच उपसंचालक सहकार विभाग, पुणे व सोलापूर येथे प्रस्तुत फिर्याद दाखल करणेपूर्वी मी अथवा माझ्या वडीलांनी तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ४० वरील खरेदीखत हे खुश खरेदीखत असल्याने दिनांक १९/०७/२०१८ रोजीचा करारनामा हा विष्णु जाधव व वैशाली सपकळ यांचेमधील स्वतंत्र करारनामा असल्यामुळेच मी अथवा माझ्या वडीलांनी महाराष्ट्र सावकारी अधिनियमाअंतर्गत संबंधीत विभागाकडे आरोपींविरूध्द तकार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, विष्णु जाधव व माझेमध्ये जॉईंट व्हेंचरमध्ये काम चालू होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, अभिलेखावर विष्णु जाधव व माझेमध्ये जॉईंट व्हेंचरमध्ये काम चालू असलेबाबतचा पुरावा दाखल नाही. साक्षीदार स्वत: सांगतो सदर पुरावा मी पोलीसांना दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, वालचंदनगर पोलीसांशी माझे वैर नाही. मी साक्ष देण्यापूर्वी दोषारोपपत्र पाहिले होते. सदर जॉईंट व्हेंचरबद्दलची कागदपत्रे अभिलेखावर नसल्याबाबत पोलीसांकडे मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १९/०७/२०१८ रोजीच्या करारनाम्यामध्ये फ्लॅटचा व्यवहार रक्कम रूपये २१,००,०००/— मध्ये ठरला व त्यामधून १३,६५,०००/— रूपये वजा करून उर्वरित रक्कम ७,३५,०००/— खरेदीवेळी देण्याचे आमच्यामध्ये ठरले हा मजकूर नमुद नाही. हे म्हणणे खरे

आहे की, ज्या दिवशी फ्लॅट आरोपींच्या नावे होईल त्या दिवशी आरोपींनी पळसमंडळ येथील जमिन माझ्या नावे करण्याचे ठरले याबाबतचा कोणताही लेखी करारनामा दिनांक १९/०७/२०१८ रोजी झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासामध्ये पॅरा. क्र. ५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ज्या दिवशी फ्लॅटचे काम पूर्ण होईल त्या दिवशी खरेदीखत पलटून देतो तसेच उर्वरित रक्कम देखील देतो असे आरोपींनी सांगितल्याबाबतचा लेखी करारनामा झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०१/०४/२०२१ रोजीच्या कथित घटनेनंतर साधारणपणे ९ महिन्यांनंतर मी प्रस्तुत फिर्याद दाखल केली आहे. साक्षीदार स्वतः सांगतो तत्पूर्वी मी तक्रारी अर्ज दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०१/०४/२०२१ रोजीच्या कथित घटनेनंतर साधारणपणे ६ महिन्यांनी म्हणजेच दिनांक १९/१०/२०२१ रोजी मी एस.पी. ऑफिस, पुणे येथे लेखी अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. २१ वरील समझुतीचा करारनामा हा माझ्या वडीलांकडे शिल्लक असलेल्या १०० रूपयेच्या मुद्रांकावर मी व माझ्या वडीलांनी मजकूर नमुद करून आरोपींच्या खोटया सहया आम्ही स्वतः केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी करत असलेल्या कन्स्ट्रक्शनच्या व्यवसायामध्ये होत असलेले करारनाम्याचे मुद्रांक हे लिहून देणार घेउन येतात. निशाणी क्र. २१ वरील करारनामा ज्याने टंकलिखीत केला त्याचे नाव साक्षीदार म्हणून मी पोलीसांना दिले होते. शैलेश मच्छिंद्र कुंभार याने निशाणी क्र. २१ वरील करारनामा टंकलिखीत केला असल्याचे मी पोलीसांना सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. २१ वरील करारनाम्यामध्ये शैलेश कुंभार याची स्वाक्षरी नाही. दिनांक १९/१०/२०२१ रोजीच्या एस.पी.ऑफिस, पुणे येथे दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत मी पोलीसांना दिली नव्हती. जुन २०१८ मध्ये मी आरोपीस रक्कम रूपये ५,००,०००/— दिल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा फिर्याद देतेवेळी पोलीसांना दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, अभिलेखावर सदर पुरावा दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ४० वरील

**नि.फौ.ख.क्र. २६५/२०२२**
**निशाणी क्र. २०**

खरेदीखत हे खुषखरेदीखत असताना देखील त्याचप्रमाणे दिनांक १९/०७/२०१८ रोजीचा करारनामा हा विष्णु जाधव व वैशाली सपकळ यांचेमध्ये स्वतंत्र व्यवहार असताना देखील केवळ सदर शेतजमिन व फ्लॅट आरोपींनी मला उलटून दयावा या हेतूने आरोपींवर सावकारी संदर्भात प्रस्तुतची खोटी फिर्याद मी दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, याच न्यायालयात माझेविरूध्द चेकचे तीन खटले दाखल आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून मी आरोपींविरूध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये कथन केल्याप्रमाणे आरोपींनी माझ्यासोबत अथवा माझे वडीलांसोबत सावकारीचा कोणताही व्यवहार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/—
(एस. बी. लेंडवे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

ठिकाण इंदापूर
दिनांक १२/०१/२०२६